आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
१८ डिसेंबर २०२५ - गुरूवार

**ठळक बातम्या**

- व्हीबी जीरामजी विधेयक लोकसभेत आवाजी मतदानानं मंजूर; तर राज्यसभेत त्यावर चर्चेला प्रारंभ

- ‘अणुऊर्जा विषयक  विधेयक संसदेत मंजूर

- तीन देशांचा दौरा आटोपून प्रधानमंत्री मायदेशी परत/ त्यांच्या ओमान भेटीदरम्यान व्यापक आर्थिक भागीदारी करारावर स्वाक्षऱ्या

- महाराष्ट्राचे क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे यांचा राजीनामा

**आणि**

- शिल्पकार राम सुतार यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामाने अंत्यसंस्कार

**<><><><><>**

विकसित भारत- रोजगार आणि आजीविका हमी अभियान अर्थात व्हीबी जी-राम जी विधेयक २०२५ आज लोकसभेत आवाजी मतदानाने मंजूर झालं. हे विधेयक २० वर्षांपासून चालत आलेल्या, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा, २००५ अर्थात 'मनरेगा'ची जागा घेईल. मनरेगात १०० दिवसांच्या रोजगाराची हमी होती, तर नव्या विधेयकात सव्वाशे दिवसांच्या कामाची हमी प्रस्तावित आहे. पूर्वी या योजनेचा संपूर्ण निधी केंद्र सरकार देत असे, आता मोठ्या राज्यात ६० टक्के निधी केंद्राचा आणि उर्वरित ४० टक्के निधी राज्यांचा असेल. ईशान्येकडच्या आणि हिमालयातल्या राज्यांमध्ये केंद्राचा वाटा ९० टक्क्यांपर्यंत असेल.

केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंग चौहान हे विधेयक मांडत असताना विरोधकांनी घोषणा देऊन आणि विधेयकाच्या प्रती फाडून निषेध  नोंदवला. मात्र विधेयक आवाजी मतदानाने मंजूर झाल्याचं  सभापती ओम बिर्ला यांनी जाहीर केलं आणि  कामकाज दिवसभरासाठी तहकूब केलं.

राज्यसभेत आज या विधेयकावर चर्चा सुरु झाली. उद्या संसदेच्या  हिवाळी अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे.

<><><><><>

त्याआधी व्हीबी- जी राम जी हे विधेयक मागे घ्यावं, या मागणीसाठी आज विरोधी पक्ष सदस्यांनी संसद भवन परिसरात निदर्शनं केली. केंद्र सरकारने राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचा अपमान केला असून भारताच्या ग्रामीण भागात सामाजिक आर्थिक परिवर्तन घडवून आणणाऱ्या योजनेवरही गदा आणली आहे, असं काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे समाज माध्यमावरच्या संदेशात म्हणाले.

मनरेगाऐवजी नवीन कायदा आणण्याच्या सरकारच्या निर्णयावर चर्चा करण्यासाठी काँग्रेसच्या कार्यकारिणीची बैठक येत्या २७ तारखेला होणार आहे. या बैठकीत सध्याच्या राजकीय परिस्थितीवरही चर्चा होईल.

<><><><><>

‘अणुऊर्जेचा शाश्वत वापर आणि प्रगती विधेयक आज राज्यसभेत संमत झालं. लोकसभेत काल हे विधेयक मंजूर झालं होतं. अणु ऊर्जेचा विकास आणि नागरिकांच्या कल्याणासाठी अणुऊर्जा निर्मितीमध्ये किरणोत्साराचं आयनीकरण, तसंच अणुऊर्जेच्या सुरक्षित वापरासाठी मजबूत नियामक चौकट निर्माण करणं, हे या विधेयकाचं उद्दिष्ट आहे. अणु उर्जा प्रकल्पाशी संबंधित अपघात झाल्यास सरकारचं उत्तरदायित्व निश्चित करण्यात आलंय आणि त्याकरता विशेष अणुऊर्जा उत्तर दायित्व निधीची तरतूद आहे.

‘कर्करोग, मधुमेह, हृदयरोग आणि पक्षाघात प्रतिबंध आणि नियंत्रण राष्ट्रीय कार्यक्रम’ हा केंद्रसरकारचा महत्त्वाकांक्षी उपक्रम असून, या अंतर्गत देशभरातल्या सर्व जिल्हा रुग्णालयांमध्ये कर्करोगावर उपचार दिले जातील, असं प्रधानमंत्री कार्यालयाचे राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी आज राज्यसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितलं. येत्या ३ वर्षांत जिल्हा रुग्णालयांमध्ये ३७२ ‘डे केअर कॅन्सर सेंटर’ स्थापन करण्याची सरकारची योजना असून, त्यापैकी २०० सेंटर्स २०२५-२६ या आर्थिक वर्षात स्थापन केली जातील, असं ते म्हणाले.

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज लोकसभेत ‘सिक्युरिटीज मार्केट्स कोड बिल २०२५’ सादर केलं. भारतीय शेअर बाजाराशी संबंधित सर्व कायद्यांचं एकत्रीकरण करून त्यामध्ये सुधारणा करणं, हे या विधेयकाचं उद्दिष्ट आहे.

<><><><><>

खेलो इंडिया योजने अंतर्गत एप्रिल २०२४ पर्यंत देशभरातल्या खेलो इंडिया केंद्रांमध्ये २८ हजारापेक्षा जास्त खेळाडूंना प्रशिक्षण देण्यात आल्याचं, क्रीडा आणि युवा व्यवहार मंत्री मनसुख मांडवीय यांनी आज राज्यसभेत एका प्रश्नाच्या लेखी उत्तरात सांगितलं. देशभरात ९९१ खेलो इंडिया केंद्र कार्यरत असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

<><><><>

भारत आणि ओमानमधे व्यापक आर्थिक भागीदारी करार आज झाला. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या ओमान भेटीत मस्कत इथं आज कारारावर स्वाक्षऱ्या झाल्या. उभय देशांच्या संबंधांमधला हा एक ऐतिहासिक टप्पा आहे. या करारानुसार, भारताच्या कापड, चामडं, पादत्राणं, रत्न आणि आभूषणं, अभियांत्रिकी उत्पादनं, प्लास्टिक, फर्निचर, शेती, औषध उत्पादन, वैद्यकीय उपकरणं आणि ऑटोमोबाईल उत्पादनांना ओमानच्या ९८ टक्क्यापेक्षा जास्त टॅरिफ लाईन्सवर शून्य सीमाशुल्क आकारलं जाईल. भारताच्या एकूण निर्यात मूल्यामध्ये याचा ९९ टक्क्यापेक्षा जास्त वाटा आहे. युनायटेड किंगडम बरोबरच्या करारानंतर सहा महिन्यांमधला भारताचा हा दुसरा मुक्त व्यापार करार आहे. वर्ल्ड ट्रेड सेंटर आणि इतर व्यापार संघटनांनी या कराराचं स्वागत केलं आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी ओमानच्या दौऱ्यावरून आज मायदेशी परतले. भारत आणि ओमान दरम्यानचे द्विपक्षीय संबंध दृढ करण्यासाठी दिलेल्या भरीव योगदानाबद्दल, त्यांना आज ओमानचे सुलतान ‘हैथम बिन तारिक’ यांनी 'ऑर्डर ऑफ ओमान', या ओमानच्या सर्वोच्च नागरी पुरस्कारानं सन्मानित केलं. प्रधानमंत्री मोदी यांच्या तीन देशांच्या दौऱ्याचा हा शेवटचा टप्पा होता.

<><><><>

सदनिका घोटाळ्याप्रकरणी महाराष्ट्राचे क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे यांना नाशिक जिल्हा आणि सत्र न्यायालयाने दोषी ठरवल्याच्या पार्श्वभूमीवर आज त्यांनी आपला राजीनामा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे सुपूर्द केला.

<><><><>

नाशिक इथं भरणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यात साधुग्राम उभारण्यासाठी तपोवनातल्या वृक्षतोडीला मुंबई उच्च न्यायालयाने १४ जानेवारीपर्यंत स्थगिती दिली आहे. नाशिक इथे

राहणाऱ्या एका नागरिकाने या संदर्भात दाखल केलेल्या जनहित याचिकेवर आज उच्च न्यायालयात तातडीची सुनावणी झाली. तपोवनातली ही झाडं ३० ते ४० वर्षं जुनी असून नाशिकला प्राणवायूचा पुरवठा करतात. त्यामुळे साधुग्रामच्या निर्मितीसाठी अन्यत्र जागा उपलब्ध करून द्यावी अशी मागणी याचिकेत करण्यात आली होती. या याचिकेची दखल घेऊन न्यायालयाने सर्व प्रतिवादींना नोटीस बजावली असून येत्या १४ जानेवारीपर्यंत वृक्षतोडीला स्थगिती दिली आहे.

**<><><><><>**

जागतिक बाजारातला मंदीचा कल आणि अमेरिकेबरोबरच्या व्यापार कराराबाबतची अनिश्चितता, या पार्श्वभूमीवर मुंबई शेअर बाजारात आज सलग चौथ्या सत्रात घसरण दिसून आली.

शेअर बाजाराचा सेन्सेक्स ७८ अंकांनी घसरला आणि ८४ हजार ४८२ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराच्या निफ्टीमध्ये ३ अंकांची  किरकोळ घसरण झाली आणि तो २५ हजार ८१६ अंकांवर बंद झाला.

**<><><><><>**

दिल्लीत गेल्या महिन्यात झालेल्या बॉम्बस्फोट प्रकरणात यासिर अहमद दार या आरोपीला येत्या २६ डिसेंबरपर्यंत एनआयए कोठडी पटियाला हाऊस न्यायालयाने दिली आहे. या प्रकरणात अटक झालेला तो नववा आरोपी आहे.

**<><><><><>**

ख्यातनाम  शिल्पकार महाराष्ट्र भूषण राम सुतार यांच्या पार्थिवावर आज  नोएडा इथल्या वैकुंठ स्मशानभूमीत शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले तसंच राज्य शासनाच्या वतीनं  राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी पुष्पचक्र अर्पण करून आदरांजली वाहिली. सुतार यांच्या निधनाबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सीपी राधाकृष्णन, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यासह अनेक मान्यवरांनी तीव्र दुःख व्यक्त केलं आहे.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी सुतार यांना श्रद्धांजली वाहिली आहे.

देशाच्या कानाकोपऱ्यातून तसंच परदेशातूनही सुतार यांना श्रद्धांजली वाहण्यात येत आहे.

राम  सुतार यांचं आज वयाच्या १०१ व्या वर्षी निधन झालं. युनिटी ऑफ स्टॅच्यू हे आंतरराष्ट्रीय दर्जाचं स्मारकाचं आरेखन त्यांनी केलं होतं. याखेरीज अनेक थोर व्यक्तींचे, त्यांच्या व्यक्तिमत्वाचे बारकावे दाखवणारे पुतळे सुतार यांनी उभारले होते.  १९९९ मधे पद्मश्री, तर २०१६ पद्मभूषण सन्मान त्यांना प्रदान करण्यात आला होता. त्यांच्या कलेची प्रशंसा देशोदेशी झाली होती. 'महाराष्ट्र भूषण पुरस्कार नुकताच त्यांना प्रदान करण्यात आला.

**//<><><><><>//**